महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०१७ मध्ये नागपूर येथे होणारे चौथे (हिवाळी) अधिवेशनासाठी वाहने अधिग्रहित करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः नाहिअ-३४१७/ प्र.क्र. १३१/ सात

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २३ ऑक्टोबर, २०१७

शासन परिपत्रक

नागपूर येथे होणाऱ्या विधानमंडळाच्या अधिवेशनकाळात मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री, तसेच शासनाचे व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी, मंत्रालयीन शिबिर कार्यालये, इत्यादीसाठी आवश्यक असलेली वाहने (मोटारगाडया व जीप्स) अधिग्रहीत करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना या आदेशाव्दारे प्रदान करण्यात येत आहेत. त्यांनी आवश्यकतेनुसार योग्य संख्येने नजिकच्या विभागातून (नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक) सुस्थितीत असलेली वाहने अधिग्रहीत करावीत. अधिग्रहीत केलेली वाहने कमी पडल्यास, लांब पल्यावरुन येणारी वाहने न मागविता, आवश्यकतेनुसार स्थानिक खाजगी वाहने भाडेतत्वावर घेण्याचे अधिकारही विभागीय आयुक्त, नागपूर यांना देण्यात येत आहेत. विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडून अधिग्रहीत केलेल्या सर्व वाहनांचे वाटप आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

२. गृह विभागासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त वाहनांची सोय नेहमीप्रमाणे पोलीस आयुक्त, नागपूर यांनी करावी.

३. मंत्रालयीन विभागांचे अधिकारी, शिबीर कार्यालये, तसेच मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री यांची कार्यालये यांनी अधिवेशन कालावधीत फक्त विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी वाटप केलेली वाहने वापरावीत. जादा वाहनांची आवश्यकता भासल्यास, त्यांनी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

४. तसेच मंत्रालयीन विभागांचे अधिकारी, शिबीर कार्यालये, तसेच मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री यांची कार्यालये यांना पुरविण्यात आलेल्या शासकीय वाहनांचा वापर काटकसरीने करावा. त्याकरिता सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. नाहिअ-३०१५/ प्र.क्र.१५५/सात, दि.१० नोव्हेंबर, २०१५ मधील सूचनांचे पालन करावे.

५. नागपूर विभागातील शासकीय कार्यालयांनी मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांची कार्यालये व मंत्रालयीन विभागांची शिबीर कार्यालये यांना आपली वाहने परस्पर न देता, विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्याकडे असलेल्या वाहनांच्या ताफ्यात समाविष्ट करावीत. शासकीय निर्देशांचे पालन न करता, क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्याकडील वाहने परस्पर त्यांच्या नियंत्रक अशासकिय विभागाच्या शिबीर कार्यालयाकडे सुपूर्द केल्याचे आढळून आल्यास, अशा वाहनांचा इंधन व दुरुस्तीचा खर्च विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयाकडून भागविला जाणार नाही. तसेच विभागीय आयुक्त, नागपूर

यांच्या कार्यालयाकडून, अशा शिबीर कार्यालयांना वाहने पुरविली जाणार नाहीत व त्यामुळे होणाऱ्या गैरसोयीची सर्वस्वी जबाबदारी त्या संबंधित विभागाची राहील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२३१७२७५३०००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagwan Muralidhar Sahai

Digitally signed by Bhagwan Muralidhar Sahai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=57dd6ec1681532b63c78bdc2d0f79ab4b9efccc6814de3df1f59d557777b3c45, cn=Bhagwan Muralidhar Sahai
Date: 2017.10.23 17:17:19 +05'30'

(डॉ. भगवान सहाय)
अपर मुख्य सचिव (प्र.सु. व र.व का.)

प्रत,

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
३. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
४. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
५. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
६. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
७. जिल्हाधिकारी नागपूर, नागपूर.
८. जिल्हाधिकारी अमरावती, अमरावती.
९. जिल्हाधिकारी औरंगाबाद, औरंगाबाद.
१०.जिल्हाधिकारी नाशिक, नाशिक.
११.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
१२.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १, नागपूर.
१३.सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०० ०३२.
१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (मुल्यांकन व राष्ट्रीयीकरण),महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५.मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर जिल्हा परिषद, नागपूर.
१६.अधीक्षक अभियंता, मार्ग प्रकल्प मंडळ, अकोला.
१७.अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ, नागपूर.
१८. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम व (गृह मंडळ), अमरावती.
१९.अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, अकोला.

२०.अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर.
२१.अधीक्षक अभियंता, अकोला सार्वजनिक आरोग्य मंडळ, अकोला.
२२.अधीक्षक अभियंता, नागपूर सार्वजनिक मंडळ, नागपूर.
२३.अधीक्षक अभियंता, पाटबंधारे प्रकल्प मंडळ, नागपूर.
२४. संचालक, भूगर्भशास्त्र आणि खानिकर्म महाराष्ट्र, नागपूर.
२५. मुख्य वनसंरक्षक, नागपूर मंडळ, नागपूर.
२६. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. १४, नागपूर.
२७. कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. १३, नागपूर.
२८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ.
२९.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग,नागपूर.
३०. कामगार उप आयुक्त, नागपूर.
३१. जिल्हा सहायक, भूगर्भशास्त्र, भूजलसर्वेक्षण व विकास अभिकरण, नागपूर.
३२.अधीक्षक कृषि अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर.
३३. उप संचालक, पशुसंवर्धन, नागपूर.
३४.उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
३५.उप संचालक, भूगर्भशास्त्र, भूजलसर्वेक्षण व विकास अभिकरण, नागपूर.
३६. निवड नस्ती, कार्यासन सात, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.